१. अतिरीक्त वर्ग/तुकडयांचे वाटप करताना शासन निर्णय दिनांक २.१२.९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्यांत यावी.

२. मंजूर करावयाच्या अतिरिक्त वर्ग/तुकडयांची गरज आहे व निकषानुसार सरासरी उपस्थिती असल्याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तूकडया मंजूर करण्यांत याव्यात.

३. ज्या शाळांना विना अनुदान तत्वावर (कालांतराने अनुदान तत्वावर येणाऱ्या) परवानगी देण्यांत आली आहे अशा शाळांना मंजुर करण्यांत येणाऱ्या अतिरिक्त वर्ग/तुकडयांना शासन निर्णय क्र. व्हीएलएस-१०००/(२४५५)/प्राशि-१, दिनांक ८.११.२००० मध्ये नमुद केलेले अनुदान सुत्र व अटो व निकषाचा अवलंब करण्यात येईल.

४. शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी विना अनुदान तत्वावर मंजूर करण्यांत आलेल्या पात्र वर्ग/तुकडयांना ५ व्या वर्षी २०% अनुदान तत्वावर आणण्यासाठी आवश्यक तरतुद २००४-२००५ या वर्षी जिल्हा नियोजन व विकास समित्यांकडून उपलब्ध करुन घ्यावी.

५. इंग्रजी माध्यमाच्या व इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त इतर माध्यमाच्या ``कायम विना अनुदान`` तत्वावरील प्राथमिक शाळांच्या अतिरीक्त वर्ग/तुकडयांना परवानगी देतांना संबंधिताकडून आवश्यक ते प्रतिज्ञापत्र घेऊनच परवानगी देण्यात यावी.

६. जून २००० पासून मान्यता दिल्यानंतर अतिरीक्त वर्ग/तुकडी ज्या शाळांनी अशी तुकडी सुरु केली नसेल तर त्या वर्षापुरती सदर तुकडी ग्राहय धरण्यात येऊ नये. मात्र अशाप्रकारे अग्राहय ठरलेली परंतू प्रत्यक्षात मान्य असलेली तुकडी पुनर्जिवित करण्यांसाठी प्रस्ताव शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचेकडे पाठवावा.

७. खाजगी अनुदानीत अथवा विना अनुदानीत/कायम विना अनुदानीत कोणत्याही प्राथमिक शाळेच्या जादा तुकडीस/नवीन वर्गास मंजूरी देण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रतिलिपी :

१. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र माहितीस्तव सादर.

२. मुख्याध्यापक, पार्थ प्राथमिक शाळा, अंकुशनगर ... जालना यांना ... कार्यवाहीस्तव देण्यांत येते.

80

जा.क्र. जिपजा. शिक्षण.प्रा-६.२००१./43
कार्यालय जिल्हा परिषद,जालना.
दिनांक: 30/12/2001

मा.उपसंचालक यांचे पत्र दि.१.१०.२००१ नुसार मान्य झालेल्या तुकड्यांचे आदेश पुढील कार्यवहीस्तव निर्गमित करण्यात येत आहे. सदर आदेशात दिलेल्या अटीनुसार कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद जालना

(8)

जा.क्रं.प्रावि-5/91-92/
विभागीय शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय
औरंगाबाद विभाग, स्टे.रोड बन्सीलालनगर
औरंगाबाद, दिनांक :-

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, --जालना----

विषय :- मान्यता प्राप्त विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना (इंग्रजी माध्यमि वगळून) अनुदान मंजूर करणे बाबत

संदर्भ :- 1. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक: व्हीएलएस-7088/(8779)प्राशि-1 दि.28.4.89.
2. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रं. व्हीएलएस 1090/(9244)प्रावि-1 दि.7 जून90
3. शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद यांचे प.क्रं. जिपजा/शिक्षण/प्रा/6 92/620 दिनांक 9.4.92

.....

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.2 अन्वये खालील परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या मान्यता प्राप्त विना अनुदानित प्राथमिक शाळांना (इंग्रजी माध्यमाच्या वगळून) त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या टक्केवारी प्रमाणे वेतन अनुदान व वेतनेतर अनुदान त्यांचीच कार्यवाही करावी. सदर वेतन अनुदान वितरण करतांना शासनाने त्यांचे दि.28.4.89 आणि शासनाचे पत्र दि.31 मे 1989 मध्ये दर्शविलेल्या अटीच्या धीन राहून कार्यवाही करावी.

तसेच अप्रशिक्षित शिक्षकांच्या व इतर शिक्षकांच्या बाबतीत या कार्यालयाची परवानगी घेऊन पुढील कार्यवाही करावी. नियमाप्रमाणे शिक्षक संख्या मान्य करावा.

परिशिष्ट "अ"

| क्रं. शाळेचे नांव | माध्यम | मान्यता वर्ष | अनुदानीस पात्र ठरलेली टक्केवारी. |
| --- | --- | --- | --- |
| 2. | 3. | 4. | 5. |
| गोदरी शिक्षण संस्था, जालना ...र्थ प्राथमिक शाळा अंकुशनगर ...ड जि.जालना. | मराठी | जुन-1987 | जुन-90 पासून 25% वेतन अनुदानास पात्र व त्यापुढील अनुदान जुन:91 50%, जुन-92 75% अनुदानास पात्र |